# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.05.2026** **वारः मंगळवार**

1. विधानपरिषदेच्या 16 जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर; 18 जूनला मतदान आणि 22 जूनला मतमोजणी होणार
2. अहिल्यानगर जिल्ह्यातील संरक्षण साहित्य उद्योगाचं 23 मे रोजी उद्घाटन
3. सिंधुदुर्ग जिल्ह्यात नौदलाच्या निवृत्त युद्धनौकेचं रूपांतर पर्यटन केंद्रात; समुद्र तळाशी साकारणार पर्यटन केंद्र
4. नीट पेपरफुटीप्रकरणी खासगी शिकवणी वर्गचालक शिवराज मोटेगावकर यांना पुण्यातून अटक आणि
5. पालघर जिल्ह्यात रस्ते अपघातात 13 जणांचा मृत्यू; 20 जखमी

**विधान परिषद निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या 16 जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून द्यायच्या सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली आणि छत्रपती संभाजीनगर-जालना या 16 मतदारसंघांमधल्या सदस्यांचा कार्यकाळ संपल्यानं ही निवडणूक होणार आहे. यासह चंद्रशेखर बावनकुळे विधानसभेत निवडून आल्यामुळे, त्यांनी विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानं, रिक्त झालेल्या एका जागेसाठीही निवडणूक होणार आहे. याबाबतची अधिसूचना येत्या 25 तारखेला जारी होईल. 1 जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, तर 4 जूनपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. मतदान 18 जून रोजी होणार असून 22 जूनला मतमोजणी होईल. याबरोबरच संबंधित क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

**तोफगोळा प्रकल्प**

अहिल्यानगर जिल्ह्यात संरक्षण साहित्य उत्पादन उद्योग उभा राहत आहे. शिर्डीमधील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचं उद्घाटन येत्या 23 मे रोजी संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्हा, देशातील महत्त्वाचं संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसित होणार असल्याची माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि ग्लोब फोर्ज लिमिटेडचे संचालक आणि चेअरमन रविकांत यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**मोदी-नॉर्वे दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल ओस्लो इथं भारत-नॉर्वे व्यापार आणि संशोधन शिखर संमेलनात सहभागी झाले. त्यांनी नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चाही केली. स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवणं, हरित धोरणात्मक भागीदारी दृढ करण्याविषयी दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना नॉर्वे आणि स्वीडन या दोन्ही देशांनी आपल्या सर्वोच्च पुरस्कारांनी सन्मानित केलं आहे. पाच देशांच्या दौऱ्याच्या पाचव्या टप्प्यात पंतप्रधान मोदी आज इटलीला रवाना होतील. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**केरळ मुख्यमंत्री**

केरळमध्ये संयुक्त लोकशाही आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांनी काल थिरुवनंतपुरममध्ये शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. सतीशन यांच्यासह वीस जणांनी

मंत्रीपदाची शपथ घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, नेते राहूल गांधी तसंच प्रियांका गांधी वद्रा आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, केरळचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री व्ही.डी. सतीशन यांचं अभिनंदन केलं आहे.

**तीर्थक्षेत्र विकास**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल राज्यातल्या सहा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांसंदर्भात शिखर समितीची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातल्या विविध तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी 993 कोटी 72 लाख रूपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली. राज्यातील भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवंद्र फडणवीस यांनी दिले.

**जल क्रांती परिषद**

विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचं प्रमुख कारण सिंचनाचा अभाव आहे; जलसंवर्धनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचं जीवन बदलू शकतं असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. प्रत्येक गावात जलसंवर्धन, नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामं लोकसहभागातून केली जावी, असं आवाहनही त्यांनी केलं. ते काल नागपूरमध्ये 'जलक्रांती' परिषदेत बोलत होते.

जलसंधारण मंत्री संजय राठोड, नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर, सचिव मकरंद अनासपुरे, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

जलसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

**अंडरवॉटर म्युझियम**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात निवती रॉक दीपगृहाजवळच्या समुद्रात भारतातल पहिल अंडरवॉटर म्युझियम, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन प्रकल्प साकारतो आहे. अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधिकडून.....

**निसर्ग संपन्न कोकण किनारपट्टीच्या शिरपेचात यानिमीत्तानं आता एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. भारतीय नौदलातून 39 वर्षाच्या गौरवशाली सेवेनंतर निवृत्त झालेली युद्ध नौका आयएनएस गुलदार सोमवारी रात्री उशिरा निवती रॉक दीपगृहाजवळच्या समुद्र तळाशी स्थापित करण्यात आली आहे. युद्धनौकेत पाणी भरून हि नौका समुद्र तळाशी स्थापित करण्यात आली. गेले नऊ महिने गुलदार विजयदुर्ग बंदरात होती आज पहाटे तिला नियोजित स्थळी टग बोटीने ओढून आणण्यात आली. आता या युद्धनौकेच रूपांतर समुद्राखालील अद्वितीय अंडर वॉटर म्युझियम मध्ये करण्यात येणार आहे. 2024 मध्ये या प्रकल्पाला शासनाची मंजुरी मिळाली होती. एक ते दीड वर्षात या ठिकाणी प्रवाळ आणि माशांची घरटी तयार होतील. स्कुबा डायव्हिंग आणि 24 आसनी पाणबुडीच्या साहाय्यानं हे पाहता येणार आहे. पर्यावरणपूरक पर्यटनाचा आदर्श निर्माण करणारा हा प्रकल्प जैवविविधतेच्या दृष्टीनेसुद्धा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पामुळे सिंधुदुर्ग हे केवळ समुद्रकिनाऱ्यांपुरत मर्यादित न राहता 'अंडरवॉटर टुरिझम डेस्टिनेशन' म्हणून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणार आहे.**

**नीट पेपरफूटी**

नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं लातूरच्या खाजगी शिकवणी वर्गाचा संचालक शिवराज मोटेगावकर याला काल पुण्यातून ताब्यात घेतलं. दिल्लीतील राऊज अवेन्यू न्यायालयानं त्याला 9 दिवसाची सीबीआय कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात सीबीआयनं मोटेगावकरची 11 तास चौकशी केली होती. त्यानंतर त्याच्या लातूर इथल्या प्रशिक्षण केंद्रात शोधमोहीम राबवून सीबीआयनं संशयास्पद दस्तऐवज, संगणक आणि मोबाईल फोन जप्त केले होते.

**प्रताप सरनाईक**

वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं.

महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या बैठकीनंतर ते काल मुंबईत बोलत होते. डिझेल दरवाढीमुळे महामंडळावर दर महिन्याला 10 कोटी रुपयांचा, तर वार्षिक सुमारे 124 कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करत आहे, त्यामुळे भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घ्यावा लागू शकतो, असं सरनाईक म्हणाले.

**महा-पेट्रोल-डिझेल**

दरम्यान राज्यातील पेट्रोल पंपांवर आणि साठवणूक केंद्रांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, लोकांनी 'घाबरून जाऊन अतिरिक्त खरेदी करू नये,' असं आवाहन तेल विपणन कंपन्यांनी केलं आहे.

**कांदे आंदोलन**

कांद्याच्या भावात झालेल्या घसरणीच्या निषेधार्थ काल राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने लासलगाव इथं आंदोलन करण्यात आलं. कांद्याला राज्य सरकारनं केवळ 1300 रूपये भाव घोषीत केला आहे. तो 2400 रूपये प्रति क्विंटल करावा, बाजार समित्यंमधूनच कांदा खरेदी करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**अपघात-पालघर**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर, पालघर जिल्ह्यातील धानीवरी जवळ, काल संध्याकाळी लग्नाच्या वऱ्हाडाचा ट्रक आणि कंटेनर एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात 13 जणांचा मृत्यू झाला असून 20 जण जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**उष्णता**

विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात कमाल तापमान वाढत असून अकोल्यात काल पारा 46 अंशांच्या पुढे गेला होता.

**हवामान**

येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी वीजांसह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार